RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक १२(२)] गुरुवार, जून २५, २०२६/ आषाढ ४, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक १६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

नगरविकास विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २५ जून, २०२६.

अधिसूचना

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८.

क्रमांक बीएमसी-२५२६/प्र.क्र.७७८/नवि-२१.—ज्याअर्थी, श्री. शमीर रमजान पटेल यांनी सन २०२६ मध्ये झालेली बृहन्मुंबई महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक लढवली असून, ते नागरिकांच्या मागास वर्गाकरिता राखीव असलेल्या जागेवर प्रभाग क्रमांक १३७ मधून नगरसेवक म्हणून निवडून आले होते;

आणि ज्याअर्थी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अहिल्यानगर यांनी आपल्या दिनांक २७ मे २०२६ च्या आदेशान्वये श्री. शमीर रमजान पटेल यांचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याचे घोषित ठरवून रद्द केले आहे ;

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३), च्या कलम १६ च्या पोट-कलम (१क) च्या खंड (अ) अनुसार, श्री. शमीर रमजान पटेल हे नगरसेवक पदासाठी अपात्र ठरल्याने, त्यांची नगरसेवक पदाची जागा रिक्त झाली आहे.

त्याअर्थी, आता, मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३), च्या कलम १६ च्या पोट-कलम (१क) च्या खंड (ब) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे श्री. शमीर रमजान पटेल यांना दिनांक २७ मे २०२६ पासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी नगरसेवक म्हणून निवडून येण्यास किंवा राहण्यास अपात्र ठरवत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार नावाने,

विद्या हम्पय्या,
शासनाच्या सह सचिव.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated the 25th June, 2026.

NOTIFICATION

MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, 1888.

No.BMC-2526/C.R.778/UD-21.—Whereas, Shri Shamir Ramjan Patel has contested the general elections of the Municipal Corporation of Brihan Mumbai held in the year 2026 and was declared elected as a Councillor from Ward No. 137 on a seat reserved for the person belonging to Backward Class of Citizens;

And whereas the District Caste Certificate Scrutiny Committee, Ahilyanagar has *vide* its Order dated the 27th May 2026 declared the Caste Certificate of Shri Shamir Ramjan Patel as invalid and cancelled the same;

And whereas, Shri Shamir Ramjan Patel having been disqualified for being a Councillor under clause (*a*) of sub-section (*1C*) of section 16 of the Mumbai Municipal Corporation Act (III of 1888), his seat as such Councillor have become vacant.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*1C*) of section 16 of the Mumbai Municipal Corporation Act (III OF 1888) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby disqualifies Shri.Shamir Ramjan Patel for being elected or being a Councillor for a period of six years from the 27th May 2026.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIDYA HAMPAYYA,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.